# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 09 April 2025

# Time 7.10 AM to 7.20 AM

# Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०९ एप्रिल २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- आगामी वेव्हज परिषदेच्या माध्यमातून भारतीय कलाकारांना आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक कमावण्याची संधी, पंतप्रधानांचं प्रतिपादन
- छत्रपती संभाजीनगरसह महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीतल्या शासकीय जमिनींचं प्राधिकरणाकडे हस्तांतरण
- आपत्ती व्यवस्थापनासाठी राज्यभरात आदेश आणि नियंत्रण प्रणाली स्थापन करण्यात येणार–मुख्यमंत्र्यांची माहिती
- धुळे – सोलापूर महामार्गावर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात औट्रम घाटात १५ किलोमीटर लांबीच्या तीन बोगद्यांना सरकारची मंजूरी

आणि

- अंबाजोगाई इथलं प्राचीन सकलेश्वर अर्थात बाराखांबी मंदिर राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित

****

मनोरंजन उद्योग मोठ्या उद्योगांपैकी एक असून, आगामी काळात याचा मोठा विस्तार होणार असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. एका खाजगी वृत्तसंस्थेनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते काल बोलत होते. सरकारने पुढील महिन्यात मुंबईत वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल आणि एंटरटेनमेंट म्हणजेच वेव्हज परिषदेचं आयोजन केलं आहे. या परिषदेमुळे भारतीय कलाकारांना कंटेट तयार करण्यासाठी आणि आपली कला जागतिक पातळीवर पोहचवण्यासाठी उपयोग होणार असल्याचं पंतप्रधान म्हणाले,

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

****

छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूर आणि पुणे या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीतल्या शासकीय जमिनी, संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय, राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. काल मंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. या निर्णयामुळे विकास कामांना वेग येण्याची अपेक्षा आहे.

खाजगी अनुदानित आयुर्वेद आणि खाजगी अनुदानित युनानी संस्थांमधल्या, गट-ब, क आणि ड संवर्गातल्या शिक्षकेतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना, पूर्वलक्षी प्रभावानं, 'सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना' लागू करण्याचा निर्णयही, मंत्रिमंडळानं घेतला आहे.

राज्यातल्या ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

राज्याचं वाळू-रेती धोरण २०२५ या बैठकीत जाहीर करण्यात आलं. याअंतर्गत घरांच्या बांधकामांसाठी पाच ब्रास वाळू मोफत दिली जाईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. नव्या धोरणात डेपो पद्धत बंद करुन वाळू घाटांची निविदा काढली जाणार असल्याचं ते म्हणाले..

**बाईट – महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

शेतकरी कुटुंबांतल्या शेतीच्या वादावर तोडगा काढणाऱ्या सलोखा योजनेला २०२७ पर्यंत, दोन वर्षांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतल्याची माहितीही, बावनकुळे यांनी दिली. या योजनेअंतर्गत आतापर्यंत एक हजार सात प्रकरणात समाधानकारक तोडगा निघाला असल्याचं, त्यांनी सांगितलं.

****

आपत्ती व्यवस्थापनासाठी राज्यभरात आदेश आणि नियंत्रण प्रणाली स्थापन करण्यात येणार असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. मुंबईत काल या यंत्रणेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. वातावरणातल्या बदलामुळे आपत्तीच्या पद्धतीही बदलत असल्याकडे मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधलं. ते म्हणाले...

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

`आपले सरकार` या पोर्टलची सेवा येत्या १० ते १४ तारखेपर्यंत, पाच दिवस बंद राहणार आहे. पोर्टलच्या नियमित तांत्रिक देखभालीसाठी ही सेवा बंद राहणार असल्याचं, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळानं एका प्रसिद्धिपत्रकाद्वारे कळवलं आहे.

****

धुळे सोलापूर महामार्गावर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कन्नड जवळच्या औट्रम घाटात, एकूण १५ किलोमीटर लांबीचे तीन बोगदे करण्यात येणार आहेत. यासाठी रेल्वे आणि भूपृष्ठ वाहतूक मंत्रालयाच्या माध्यमातून ५० टक्के भागीदारी तत्त्वावर बोगदे करण्यात येणार आहेत. काल दिल्लीत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी याबाबत एक बैठक झाली, यावेळी या प्रस्तावित बोगद्याचा डीपीआर बनवण्यासंदर्भात यंत्रणांना आदेशित करण्यात आल्याची माहिती, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड यांनी दिली. ते म्हणाले,

**बाईट – डॉ. भागवत कराड**

****

परभणी इथं न्यायालयीन कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणी, वंचित बहुजन आघाडीचे नेते आणि याचिकाकर्ते प्रकाश आंबेडकर यांनी, काल मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे विशेष तपास पथकाद्वारे चौकशीची मागणी केली. त्यांनी स्वत: न्यायालयात युक्तिवाद केल्यानंतर वार्ताहरांशी संवाद साधला. अशा प्रकरणांमध्ये पुढील कारवाई कुणी करायची याबाबत कायद्यात अपुरेपणा असल्यानं, न्यायालयाने नियमावली तयार करून मार्गदर्शन करण्याची विनंती केल्याचं आंबेडकर यांनी सांगितलं. या प्रकरणाची पुढील सुनावणी २९ एप्रिलला होणार आहे.

****

महाराष्ट्र शासनानं अंबाजोगाई इथलं ऐतिहासिक आणि प्राचीन सकलेश्वर महादेव मंदिर अर्थात बाराखांबी मंदिर, हे राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलं आहे. या निर्णयामुळे या ऐतिहासिक मंदिराच्या संवर्धन आणि संरक्षणासह पर्यटनालाही चालना मिळणार आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी याबाबत राज्य शासनाकडे पाठपुरावा केला होता.

****

पंढरपूर इथं चैत्री यात्रा कामदा एकादशीचा मुख्य सोहळा काल साजरा झाला. सुमारे तीन लाखांहून जास्त भाविकांनी चंद्रभागेत स्नान करून श्री विठ्ठल-रखुमाईचं दर्शन घेतलं.

दरम्यान, पंढरपूर इथं भाविकांच्या गर्दीचं व्यवस्थापन करण्यासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्ता-एआय-तंत्रज्ञानाचा वापर होणार असून, याबाबतची चाचणी काल पंढरपूरच्या बसस्थानकावर घेण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

पैठण इथं संत एकनाथ महाराज यांच्या समाधीला तसंच नाथ मंदिरातल्या विजयी पांडुरंगाला काल चंदनाचा लेप लावण्यात आला. दरवर्षी उन्हाळ्यात विजयी पांडुरंग तसंच संत एकनाथ महाराज यांच्या समाधीला चंदन ऊटी लावण्याची प्रथा आहे. मृग नक्षत्र सुरू होईपर्यंत दररोज हा लेप लावण्यात येतो.

****

शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्या वतीनं काल लातूरमध्ये एकदिवसीय राज्यस्तरीय परिषद घेण्यात आली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी आणि जेष्ठ अर्थतज्ञ एच.एम. देसरडा यावेळी उपस्थित होते. प्रस्तावित शक्तीपीठ महामार्ग म्हणजे शेतकरी, पर्यावरण, जनविरोधी असून, यातून फक्त भ्रष्टाचाऱ्यांचं आणि कंत्राटदारांचं हीत साधलं जाणार असल्याचा आरोप या परिषदेत करण्यात आला.

****

शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी काल परभणी इथं शालेय शिक्षण विभागाच्या छत्रपती संभाजीनगर विभागाचा आढावा घेतला. या बैठकीत आदर्श शाळा, निपुण महाराष्ट्र अभियानामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत झालेली वृद्धी, सीएम श्री शाळाबाबत माहिती, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी, विद्यार्थी लाभाच्या विविध योजना आदींचा आढावा घेण्यात आला.

****

नांदेड जिल्ह्यातल्या सगळ्या ग्रामीण आणि शहरी भागातल्या, कठडे नसलेल्या किंवा कमी उंचीचे कठडे असलेल्या विहीर मालकांनी एक महिन्याच्या आत विहीरींना सुरक्षा कठडे करुन घ्यावेत, अन्यथा कारवाईचा इशारा, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिला आहे. जिल्ह्यात गेल्या आठवड्यात आलेगाव इथं ट्रॅक्टर

ट्रॉली विहिरीत पडून सात महिलांचा मृत्यू झाल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे आदेश जारी केले.

****

धाराशिव जिल्ह्यात सुमारे दहा ते बारा बिबट्यांचा वावर वनविभागाच्या कॅमेऱ्यांमध्ये दिसून आला आहे. तुळजापूर, धाराशिव, भूम, परंडा या भागात बिबट्यांचा वावर असल्याची माहिती वनविभागाचे विभागीय अधिकारी बाळकिशोर पोळ यांनी दिली. मात्र नागरिकांनी घाबरून न जाता, शेतात रात्री एकटे न जाणं, जनावरं उघड्यावर बांधताना खबरदारी घेणं, अशी दक्षता घेण्याचं आवाहन वनविभागानं केलं आहे.

****

नांदेड इथं भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचं उद्घाटन काल जिल्हा जात पडताळणी समितीच्या अध्यक्षा फरोग मुकदम यांच्या हस्ते झालं. येत्या १४ तारखेपर्यंत चालणार्या या सप्ताहात सामाजिक न्याय विभागाच्या योजना तळागळातल्या लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्याचं काम सर्वांनी प्राधान्यानं करावं, असं आवाहन त्यांनी केलं.

****

बीड मधलं वाढतं ऊन, विविध योजनांच्या डीबीटी लाभार्थ्यांची गर्दी आणि पेठ विभागापासूनचं तहसील कार्यालयाचं अंतर लक्षात घेत, बीड प्रशासनानं आज, बुधवारी सकाळी १० ते संध्याकाळी ४ या वेळेत पेठ बीड इथल्या बालाजी मंदिरात एका विशेष शिबिराचं आयोजन केलं आहे. या शिबिराचा लाभ घेण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

****

हवामान

राज्यात काल सर्वाधिक तापमान अकोला इथं ४४ पूर्णांक दोन अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर इथं ४१ अंश, तर परभणी आणि बीड इथं सरासरी ४२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. पुढील दोन दिवस मराठवाड्यात हवामान कोरडं राहणार असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

****